# छत्रपती शिवाजी महाराज यांची युद्धनीती व धर्मनीती

**प्रा. डॉ. संजय सागरू सपकाळ** राज्यशास्त्र विभाग, श्रीमंत बाबासाहेब देशमुख महाविद्यालय, आटपाडी

Email-sanjaysapkal71@gmail.com

---

**प्रस्तावना:**

अनेक थोर पुरुषांची प्रेरणा छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्यामध्ये आहे. आज देशासमोर सुरक्षेची अनेक आव्हाने आहेत. इतिहास हा गतकाळाचा साक्षीदार, भावी काळाचा वाटाड्या असतो. जे राष्ट्र इतिहासापासून शिकत नाही ते कधीही महासत्ता बनू शकत नाहीत. शिवाजी महाराजांच्या असंख्य गुणांपैकी किती देशांच्या लोक प्रकृतीमध्ये उतरले हे महत्त्वाचे आहे. नरदुर्ग म्हणजे किल्ल्यासारखी बुलंद मजबूत, शूर, निष्ठावान, पराक्रमी मावळे महाराजांनी घडवले. शिवाजी महाराजांची नागरी सेवा प्रणाली आणि प्रशासन महसूल संकलन आणि करप्रणाली त्यांच्या राजवटीत महिलांची सुरक्षा, स्त्रियांचा आदर आणि त्यांचे कल्याण, त्यांची लष्करी रणनीती, डावपेच, सशस्त्र दल, धर्मनीती, आयुध व्यवस्थापन, नौदल व्यवस्था ही आजच्या काळातील लोकशाही विचारांना आणि प्रक्रियेला देखील शिवरायांच्या व्यक्तिमत्वातील ही गुणवैशिष्टये नवीन आकार देण्यासाठी महत्वाची ठरतात.

शिवकाळाचा विचार करता तत्कालीन अन्य राजवटीमध्ये शस्त्र अन सत्तेच्या जोरावर धार्मिक अत्याचार सुरु होते. अशावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांनी अत्यंत उद्दात्त अशी धर्मनीती स्वीकारली. मानवतावादी आणि पुरोगामी अशी ही धर्मनीती होती. हे त्यांचे गुणवैशिष्टे ठळकपणे नजरेत भरते. मानवी कल्याण हा छत्रपतींच्या भूमिकेचा गाभा होता. सद्याच्या जागतिक परिस्थितीचा विचार करता सध्या छत्रपतींच्या युद्धनीती, डावपेच व धर्मनीती विचार व आचारांना उजाळा देण्याची गरज आहे.

**मुघल आणि औरंगजेबाचे सैन्य व युद्धाचे डावपेच :**

शिवाजी महाराजांचे त्यावेळचे शत्रू होते मुघलशाही, आदिलशाही, कुतुबशाही, देशाच्या आतले देशद्रोही आणि आजचे आपल्या देशाचे शत्रू आहेत. चीन, पाकिस्तान, बांग्लादेश, दहशतवादी, माओवादी आणि देशद्रोही मुघलांनी अनेक वर्षे राज्य केल्यामुळे मुघल सैन्य हळूहळू आळशी, लालची, अत्याचार करणारे बनू लागले. फौजा मध्ये भाडोत्री सैनिकांची संख्या वाढली होती. त्यामुळे त्यांची विचारसरणी वेगवेगळी होती. त्यामध्ये एकमेकांशीही सैनिकांचे संबध फारसे चांगले नव्हते. रक्षण करण्याकरिता फार जास्त सैन्य वापरले जात होते. त्यामुळे आक्रमक कारावाईकरिता पन्नास-साठ हजार सैन्य उपलब्ध व्हायचे, त्यामुळे मुघल सैन्य एक हालते शहर होते. कुटुंबाचे कबिले, बाजार बुणगे, बिनलढाऊ सैनिक, रसद पुरवणारे असे सगळेच या सैन्याचा भाग होते. घोड्यांची रसद = सहा कि. ग्रॅम, सैनिकांची रसद = दोन कि. ग्रॅम प्रति दिवस असायची त्यामुळे बाजार बुणग्यांची संख्या सैनिकांच्या पाचपट जास्त होती.

तोफखान्याकरिता सैन्याला हत्ती, घोडे, उंट लागायचे. नद्या आणि नाले पार करणे कठीण असायचे. सैन्याचा चालण्याचा वेग दिवसाला ३० किमी इतका होता. आठवड्याला दोन विश्रांचे दिवस असायचे. लढाईचे दिवस आणि वेळ ज्योतिषशास्त्रावर अवलंबून असायचे. जिंकलेल्या भूमीवर अधिपत्य ठेवणे फार कठीण होते, ज्यासाठी सैन्याची गरज पडायची. हुकुम पत्र व्यवहार घोडेस्वारांच्या मदतीने व्हायचा. जखमी सैनिकांच्या उपचाराकरिता हकिमांची कमी असायची.

सैन्याच्या रचनेत पहिली फळी तोफखाना, दुसरी फळी एक डिव्हिजन, तिसरी फळी मुख्य सैन्य होती. घोडेस्वारांच्या सैन्यावर बाजूने हल्ला व्हायचा, मग हातघाईची झटापट होऊन सैन्याची पळापळ व्हायची. किल्ले लबाडी करून, धूर्तपणे जिंकले जायचे. तसे झाले नाही, तर चारही बाजूने वेढा घालून तोफांनी तटबंदीवर खिंडार पाडून हल्ला केला जायचा. पुरंदरचा किल्ला जिंकायला मुघलांना तब्बल चार महिने लागले. मात्र, तानाजी मालुसरे यांनी कोंढाणा किल्ला एका रात्रीत अचानक कड्याच्या बाजूने हल्ले करून जिंकला होता.

**छत्रपती शिवाजी महाराजांचे सैन्य :**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या सैन्याची सुरवात तीन-चार हजार सैनिकांनी झाली. राज्याभिषेकाच्या वेळी पंचेचाळीस हजार बारगीर, साठ हजार शिलेदार, एकूण १०५ हजार घोडदल होते. पायदल साठ हजार होते. पायदल चपळ, काटक आणि अतिशय जलद गतीने हालचाल करणारे होते. महाराजांचे अंगरक्षक दोन हजार अतिकुशल, शूर मावळे होते. सैन्यात वेगावर मर्यादा येतील असे काही नव्हते. बाजार बुणग्यांना थारा नव्हता. त्यामुळे शिवाजी महाराजांचे सैन्य लांब लांब मजल सहज मारीत असे. अचानक हालचाली करू शकत होते. युद्धाच्या वेळी नांगर सोडून प्रत्येक नागरिकाच्या हाती शस्त्र असायचे. सर्व सैनिक, गुप्तहेर कामसुद्धा करायचे. तलवारी आणि भाले ही त्याकाळी मुख्य शस्त्रे होती.

तोफ खान्यामुळे सैनिकांची हालचाल करण्याचा वेग हा कमी व्हायचा. तोफ खान्याचा वापर फक्त किल्ल्यावरती आणि नौदलाच्या बोटींवरती केला जात होता. किल्ल्यांचे मुख्य काम आजूबाजूच्या प्रदेशावर लक्ष ठेवणे होते. शत्रुंच्या किल्ल्यांवर लक्ष ठेवण्याकरिता किल्ले, महत्त्वाच्या ठिकाणी बांधले गेले होते. किल्ल्यांकरिता तटबंदी, मनोरे, वॉच, टॉवर, खंदक, एक रस्ता, बालेकिल्ला असायचा. शिवाजी महाराजांनी किल्ल्यांचा वापर आक्रमक गनिमी काव्याकरिता केला.

**शिवाजी महाराज आणि गनिमी कावा :**

शिवरायांच्या मावळ्यांनी मुघलांवर वेगवेगळ्या दिशेने हल्ले, अचानक हल्ले चढवले. कधी समोरून, कधी मागून, शत्रूंच्या कमजोर भागावर शत्रू बेसावध असताना, शत्रू रसद पुरवणाऱ्या रस्त्यांवर हल्ले करण्यात आले. छोट्या टोळ्या, आजुबाजूला

असलेल्या भागावरच आपला गुजारा करणाऱ्या नागरिकांची मदत गनिमी काव्यासाठी घेतली जायची. गुप्तहेर खात्याचे प्रमुख बहिर्जी नाईक होते. महाराजांचे गुप्तहेर खाते अति उच्च दर्जाचे होते, ज्यामुळे अनेक युद्धांमध्ये विजय मिळाला. शाहिस्तेखानावर हल्ला, सूरतवर हल्ला हे नेमक्या गुप्तहेर माहितीमुळे शक्य झाला. महाराज स्वत: गुप्तहेर खात्यावरती आपली नजर ठेवून असायचे. राज्याभिषेकाच्या वेळेला नौदलामध्ये शंभर जहाजे होती. शिवाजी महाराजांनी समुद्रामध्ये अनेक किल्ले बांधले. त्यामुळे सुरक्षा कमालीची सुधारली. गलबतावर पंचवीस ते तीस नौसैनिक, गुराबावर दीडशे ते तीनशे नौसैनिक तैनात असायचे या जहाजांनी गनिमी कावा वापरून, सागरी सुरक्षा सुधारली, समुद्रामध्ये सुद्धा स्वराज्य निर्माण केले.

छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची निर्मिती करण्यासाठी अनेक लढाया गनिमी काव्याचा वापर करून केल्या. गनिमी काव्याचा जनक म्हणून मलिक अंबरला श्रेय दिले जाते. मात्र या तंत्राचा कौशल्यपूर्वक उपयोग शिवाजी महाराजांनी केला मोगल, आदिलशाही, निजामशाही आणि कुतुबशाही या सर्वच बलाढ्य शत्रूंशी सामना करताना शिवछत्रपतींचे लष्करी आणि आर्थिक सामर्थ्य कमी पडत होते. मात्र महाराजांनी सह्याद्रीच्या दुर्गमतेचा उपयोग करत गनिमी काव्याचे युद्धतंत्र अवलंबून शत्रूला जेरीस आणले आणि हिंदवी स्वराज्य स्थापन केले.

**छत्रपती शिवाजी महाराजांची सामरिक युद्धनीती :**

एका वेळेस फक्त एकाच शत्रूशी लढाई, इतर शत्रूंशी समेट, कधी शत्रूंपासून रक्षण, कधी हल्ले, सामरिक खोली करिता आदिलशाहीवर हल्ले, मुघलांना सह्याद्री पर्वतरांगात यायला भाग पाडणे, अशी शिवाजी महाराजांची सामरिक युद्धनीती होती. वेगवेगळ्या ठिकाणाचे सैन्य नेमके हल्ल्यांच्या वेळेला एका ठिकाणी आणायचे, किल्ल्यांचा वापर एक सुरक्षित स्थान म्हणून करायचा, अशी त्यांची नीती होती. म्हणूनच पोर्तुगीझ, ब्रिटिश इतिहासकारांनी छत्रपतींची तुलना सिझर, अलेक्झांडर, हनीबल या जागतिक महायोध्यांशी केली. छत्रपती शिवाजी महाराज हे एक लष्करी प्रतिभावंत होते, ज्यांनी युद्ध लढण्याची भारतीय पद्धत विकसित केली आणि शत्रूंना भारतीय शस्त्रांनी पराभूत केले.

नरदुर्ग म्हणजे किल्ल्यासारखी बुलंद, मजबूत शूर, निष्ठावान पराक्रमी माणसे महाराजांनी घडवली. लढाईमध्ये सर्वात महत्त्वाचा घटक सैनिक आणि त्याचे शौर्य, लढाई सैनिकामुळे जिंकली जाते. प्रत्येक लढाई मध्ये सैनिक कसे लढतात. यावर जय आणि पराजय फैसला होतो. शिवाजी महाराजांनी धोकादायक परिस्थितीमध्ये सर्वात पुढे लढाई करून सैनिकांचे नेतृत्व केले आणि त्यामुळेच मराठ्यांनी त्यावेळेला महापराक्रम गाजवला. शिवाजी महाराजांची पुढून नेतृत्व करायची परंपरा आजसुद्धा भारतीय सैन्य चालवत आहे. ज्यामुळे चीन आणि पाकिस्तानला आपण धडा शिकवतो. परंतु त्याची किंमत आपल्याला आपल्या अधिकाऱ्याचे रक्त सांडून मोजावी लागते.

**शिवाजी महाराजांची धर्मनीती:**

शिवाजी महाराजांनी दख्खनमध्ये स्वबळावर हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. असामान्य धैर्य व धार्मिक सहिष्णूता या गुणांचा महाराजांच्या व्यक्तीमत्वात समन्वय झाला होता. शिवाजी महाराज धर्माभिमानी होते. आपण हिंदू असल्याबद्दल त्यांना अभिमानही होता. त्यांनी हिंदूमधील स्वाभिमान जागृत केला, धर्मप्रेम जागृत केले आणि आपल्या धर्मबांधवाना अन्यायाविरुद्ध लढण्यास प्रवृत्त केले. शिवाजी महाराज हिंदूंच्या धार्मिक स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते होते. छत्रपती शिवाजी महाराज धार्मिक वृत्तीचे असले तरी ते धर्मांध, धर्मवेडे नव्हते. त्यांनी नेहमी धर्म, सहिष्णुतेचे धोरण अवलंबले. त्यांनी आपल्या राज्यात सर्व जातिधर्माच्या लोकांना आश्रय दिला. सैन्यात नोकरी देताना धार्मिक दृष्टी ठेवली नाही. महाराजांनी शूर, पराक्रमी आणि एकनिष्ठ लोक आपल्या भोवती गोळा केले. सर्व धर्मातील लायक लोकांना त्यांनी आपल्या नोकरीत घेतले. त्यांनी मुस्लिमांनाही अधिकार पदे दिली.

शिवाजी महाराजांनी आपल्या मुस्लीम रयतेला धार्मिक स्वातंत्र्य बहाल केले. त्यांचे धर्मग्रंथ व धर्मस्थळे यांना धक्का लावला नाही. त्यांचे धार्मिक विधी व समारंभ यांना प्रतिबंध न करता त्यांना सन्मान देत सामाजिक सलोखा निर्माण केला. शिवरायांनी परधर्मातील साधूसंतांचा आदर केला. मुस्लीम धर्माच्या धर्मस्थळांना संरक्षण दिले. त्यांच्या खर्चासाठी उत्पन्न लावून दिले. परधर्मीय स्त्रियांना त्यांनी कधीच त्रास दिला नाही. उलट महाराजांनी त्यांना आदरपूर्वक सन्मानाने वागवले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या सहिष्णु धार्मिक धोरणाचा सर्वांनीच गौरव केला आहे. शिवरायांच्या सर्वधर्म समभावाचा विचार त्यांच्या हिंदवी स्वराज्याचा मूलाधार बनला.

पोर्तुगीज डेल्लनला १६७० मध्ये कळवितो, "शिवाजीराजे आणि त्यांची प्रजा मूर्तिपूजक आहे. परंतु मूर्तिपूजा न करणारांना देखील ते आपल्या राज्यात आनंदाने नांदू देतात." शिवाजीराजांना आपल्या धार्मिक परंपराचा अभिमान होता, परंतु परधर्मियांचा त्यांनी छळ केला नाही. ज्याचा त्याचा अधिकार त्याला मिळायचा हवा ही त्यांची भूमिका होती. परंतु धार्मिक मुद्यावर ध्रुवीकरण करणाऱ्या बिगर मुस्लिमावर जिझिया कर लादणाऱ्या औरंगजेबाला खरमरीत पत्र लिहून त्याला मानवी मूल्यांचे महत्त्व सांगितले. अफजलखानाला ठार मारल्यानंतर त्याच्या मुलाला पोटाशी धरून अभय दिले असे समकालीन कृष्णाजी अनंत सभासद सांगतात. सुरत मोहिमे प्रसंगी शिवरायांनी ॲम्ब्रासच्या मठाला हातदेखील लावला नाही. त्याचे त्यांनी रक्षण केले. आपल्या आणि परराज्यातील धार्मिक श्रद्धास्थानांवर त्यांनी हल्ला केला नाही. त्यांनी धार्मिक मूल्ये जोपासली.

शिवाजी महाराजांच्या व्यक्तीमत्वामध्ये नैतिकतेला महत्त्व होते. या संदर्भात चित्तवेधक उदाहरणे खूप महत्त्वाची आहेत. स्त्री वर्गाच्या संदर्भात शिवरायांनी उच्च नैतिकतेचा मानदंड निर्माण केला. त्यांनी राज्यकारभाराला सुरवात करताना स्त्रीयांची आत्मप्रतिष्ठा

जपली. तसेच त्या संदर्भात कठोर निर्णय घेतले. एका बाजूला सत्ता आणि दुसऱ्या बाजूला स्त्रियांची आत्मप्रतिष्ठा यातून एकाची निवड करावयाची होती. शिवरायांनी सत्तेला दुय्यम महत्त्व दिले आणि त्यांनी स्त्रियांच्या आत्मप्रतिष्ठेला प्रथम दर्जाचे स्थान दिले. रायबागन ही स्त्री मोघलांकडून लढत होती. मोघल हे स्वराज्याचे स्पर्धक व विरोधक होते. यामुळे रायबागन यांच्या संदर्भात एका बाजूला विरोधक (रायबागन) आणि दुसऱ्या बाजूला स्वराज्य असा बाका पेचप्रसंग होता.

अशा ही पेचप्रसंगात शिवराय यांनी सन्मानाने रायबागन यांना त्यांच्या प्रदेशात पुन्हा पाठविले. शिवाजी महाराज तंजावर वरून परत येत असताना यादवड आणि बेलवड येथे एक युद्ध झाले. शिवरायांनी ते युद्ध धर्मयुद्ध या नियमाप्रमाणे लढविले. म्हणजेच शिवरायांनी आणि शिवरायांच्या सैन्यांनी मल्लम्मा यांच्या विरोधात शस्त्राचा वापर केला नाही. मल्लम्मा या महिला होत्या. त्यांच्या विरोधात शिवरायांनी शस्त्र चालविले नाही हा एक नैतिकतेचा आणि धर्मयुद्धाचा मानदंड ठरतो. शिवरायांनी आपल्या जीवनात सखासखीचा विचाराला महत्त्व दिले होते. सईबाईसाठी 'श्री सखी राज्ञी जयंति' हा शिक्का तयार करण्यात आला होता. त्यामध्ये सखी ही संकल्पना अधोरेखित केली होती.

**समारोप :**

छत्रपती शिवरायांचे इतिहासात स्थान हे कर्तृत्ववान आणि धोरणी राजा, रणनीतीचे नैपुण्य, दुरदृष्टी, शक्ती आणि युवतीचा वापर, सर्वसामन्यांचा कैवारी, शिस्तप्रिय, कार्यकुशल शासनकर्ता, अतिकुशल युद्ध नेतृत्व, जाणता राजा ज्याने सर्वसामान्यांची हृदये जिंकली. असामान्य बुद्धिमत्ता आणि युद्धकौशल्याने तत्कालीन परिस्थितीला साजेशी युद्धयंत्रणा तयार केली. अत्याचाराने दबलेल्या हिंदूंच्या मनात स्वराज्याची ज्योत पेटवली, असे हे छत्रपती शिवराय एक युगपुरुषच होते.

शिवाजी महाराजांच्या आधी मराठा सरदार मुघलांकरिता भाडोत्री सैनिकांचे काम करायचे किंवा त्यांच्याकरिता कर वसुली करायचे, परंतु शिवाजी महाराजांनी स्वत:च्या उदाहरणाने दाखवून दिले की मराठा स्वत:चे जनतेचे आणि जमिनीचे मुघलांपासून रक्षण करून स्वत:चे स्वराज्य निर्माण करण्यास सक्षम होते. काही इतिहासकारांनी त्यांना फक्त महाराष्ट्राचे हिरो बनवुन ठेवले आहे. पण शिवाजी महाराज केवळ महाराष्ट्र नाही, तर संपूर्ण देशाचे हिरो आहेत. हिंदूस्थानच्या इतिहासात छत्रपती शिवाजी महाराजांनी व मराठा धर्माने सतरावे आणि अठरावे शतक आपल्या पराक्रमाने गाजविले. शिवाजी महाराजांची युद्धपद्धती, धर्मनीती राज्यपद्धती आधुनिक भारताला आजसुद्धा योग्य मार्गावर जाण्यामध्ये मदत करू शकते.

**संदर्भ :**

१) वाकसकर वि. स., संपादक, 'छत्रपती श्री शिवप्रभूचे चरित्र', १९६०.
२) जोशी श.ना., संपादक, 'छत्रपती श्री शिवाजीराजे यांची बखर', १९६०.
३) शेजवलकर त्र्यं. श., 'श्री शिवछत्रपती' १९६४.
४) पुरंदरे बाबासाहेब, 'राजा शिवछत्रपती', २०१४.
५) भट भा. वा., 'महाराष्ट्र धर्म शिवाजीची राजनिती'.
६) कुलकर्णी कृ. पा., 'मराठी व्युत्पत्ति कोश.
७) पित्रे का.ग., 'मराठ्यांचा युद्धइतिहास (१६००-१८१८)
८) कुलकर्णी श्रीधर रं., 'शिवकालीन राजनीती आणि रणनीती (आज्ञापत्राच्या संहितेसह)
९) कदम सदानंद, 'मराठी भाषेच्या जडणघडणीची कहाणी' वाक्प्रचारांची.
१०) डॉ. सामंत, श्रीनिवास, 'वेध महामानवाचा'.
११) केळकर य.ना., 'ऐतिहासिक शब्दकोश-प्रस्तावना.
१२) डॉ. जाधव रमेश, 'युगप्रवर्तक छत्रपती शिवराय' (अप्रकाशित)
१३) प्रा. कंगले र.प., 'कौटिलीयम अर्थशास्त्रम'.
१४) Hawkins S.M., 'The Oxford Reference Dictionary'.
१५) कुलकर्णी ए.आर., 'शिवकालीन महाराष्ट्र, पुणे, १९६९.
१६) दै. सामना, १४ जाने. २०२३, दै. महाराष्ट्र टाइम्स, २० फेब्रुवारी २०१४, दै. तरूण भारत, ७ जाने. २०२३, दै. तरूण भारत, ११ मार्च, २०२४, दै. सकाळ, १९ फेब्रु. २०२२, १९ फेब्रु. २०२४, दै. पुढारी, १९ फेब्रु. २०२४.